# पुरक पशुआहार : अॅझोला

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हा शेतीस पुरक व्यवसाय म्हणून गणला जातो. हा व्यवसाय यशस्वीरित्या करण्यासाठी पशुपालकांनी दुधाळ जनावरांच्या दुध उत्पादनाचा पूर्ण लाभ घेण्यासाठी जनावरांच्या आहाराकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. पशुपालनाचा ६० ते ७०% खर्च पशुपालनाच्या पशुआहारावर होतो. पशुआहार महागडा असल्यामुळे शेतकरी जनावरांना आहार योग्य प्रमाणात खाऊ घालू शकत नाहीत. त्यामुळे जनावरांना सर्व पोषण घटक योग्य प्रमाणात मिळत नाहीत. हे लक्षात घेता जनावरांना उपलब्ध स्वस्त पुरक खाद्य घटकांपासून संतुलित आहार बनवून खाऊ घालणे गरजेचे आहे. जेणेकरुन जनावरांना आवश्यक पोषण घटक योग्य प्रमाणात मिळतील त्याकरीता अॅझोला खाद्य जनावरांकरीता निर्मिती करणे हा चांगला पर्याय आहे.

## अॅझोलाचे महत्व :-

अॅझोला जलशैवालासारखे दिसणारे तरंगते फर्न आहे. अॅझोलामध्ये उच्च प्रथिने आणि भिन्न लीगनीन असल्यामुळे ते जनावरानां पचनास सुलभ होते. जनावरांच्या वाढीसाठी लागणारे आवश्यक घटकद्रव्ये, प्रथिने,आवश्यक अमिनो आम्ल, जीवनसत्वे (व्हिटामिन ए.बी-१२ आणि बीटाकेरोटीन) तसेच कॅल्शिअम, फॉस्फरस, पोटॅशिअम, लोह, तांबे, मॅग्नशिअम यांचा समावेश असतो. शुष्क वजन आधारीत यामध्ये २५ - ३५ टक्के प्रथिने, १० - १५ टक्के मिनरल आणि ७-१० टक्के अमिनो आम्ल असतात. अॅझोला घन आहारात मिश्र स्वरुपात किंवा नुसतेच जनावरांना खाऊ घालता येऊ शकतो. अॅझोला हे गायी - म्हशी व्यतिरिक्त मेंढ्या, डुकरे आणि ससे यांनाही दिले जाऊ शकते.

## अॅझोलाच्या वाढीसाठी आवश्यक असलेले घटक :

* अॅझोलाच्या चांगल्या वाढीसाठी तापमान २५ अंश से. पेक्षा कमी राहिल याची काळजी घ्यावी. सावलीची जाळी (शेड नेट) वापरुन प्रकाशाची तीव्रता कमी करता येते.
* वाफ्यातील पाण्याचा पी.एच. (सामू) हा ५.५ - ७.० च्या दरम्यान असावा.

## अॅझोला निर्मिती पध्दत :

* सुरुवातीस जमीन सारखी (समपातळीत) आणि स्वच्छ करुन घ्यावी.
* वाफा तयार करण्यासाठी ९ इंच खोली आणि २ मी X २ मी विटांची चौरसाकृती तयार करावी.
* विटांनी तयार करण्यात आलेल्या चौरसाकृतीच्या काठापर्यंत झाकणारी २×२ मी. पाण्याची पातळ युव्ही स्टॅबीलाइड शीट टाकावी.
* चाळून बारीक केलेली सुपीक माती १० ते १५ किलो प्रमाणात सिल्प्युलाइन पीटवर टाकावी.
* त्यामुध्ये २ किलो शेण, ३० ग्रॅम सुपर फॉस्फेट, १० लिटर पाण्यात मिसळून शीटवर टाकावे.
* त्यावर १० से.मी. पातळीपर्यंत पाणी आणि बायोगॅस मधील स्लरी किंवा स्वयंपाक घरातील वाया जाणारे पाणी यामध्ये वापरु शकतो.
* सुमारे ०.५ ते १ किलो शुध्द अॅझोला कल्चर बी, माती आणि पाणी एकसारखी बेडवर पसरावे. अॅझोलाच्या रोपांवर तात्काळ पाणी शिंपडावे.
* एका आठवड्यात अॅझोला काढणीस तयार होतो. तो काढणीसाठी चाळणीचा वापर करावा.

## अॅझोला पिटचे व्यवस्थापन :

एका आठवड्यातच्या काळात अॅझोला बेडवर सर्वत्र पसरतो.

* ५ दिवसात २० ग्रॅम सुपर फॉस्फेट आणि १ किलो शेण मिसळण्यात यावे जेणेकरुन अॅझोलाची वाढ होईल.
* खनिजद्रव्य मिश्रण ज्यामध्ये मॅग्नेशियम, लोह, तांबे, गंधक हे देखील आठवड्यातून एकदा मिसळावे म्हणजे अॅझोलातील खनिज घटकांची वाढ होईल.
* तीन दिवसातून एकदा बेड माती ताज्या ५ किलो मातीने बदलून घ्यावी.
* २५ ते ३० टक्के पाणी दर १० दिवसांनी बदलावे.
* बेड स्वच्छ ठेवावा आणि नविन अॅझोला दर सहा महिन्यांनी लावावा.

## काढणी व उत्पादन :-

लागवड केल्यापासून अझोला लवकर वाढून पीट १०-१५ दिवसांनी पूर्णत: भरुन टाकेल. त्या वेळेपासून ५००-६०० ग्रॅम प्रतिदिन अॅझोला चे उत्पादन मिळू शकते.